REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष २ पुणें, बुधवार, तारीख २८ ऑक्टोबर, १९३६. अंक ४४

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

**ह्यूम सेप्टिक टँक**
वापरल्यानें
आरोग्य व स्वच्छता ठेवली जाते.
नादुरुस्त होण्याची भीति नाहीं.
कित्येक वर्षें लोक वापरून सुखी आहेत.
संडासाचें पाणी घाण वास न येतां बाहेर येतें
व
तें भाजी उगवण्यास उपयोगांत आणतां येतें.

—o0o—

**ह्यूम पाईप**
( सिमेंट कांक्रीटच्या )
फार मजबुत व टिकाऊ असतात.
महाराष्ट्रांतील कारखानेः—
मुंबई, पुणें, सोलापूर, मिरज, द. हैद्राबाद.
**दि इंडियन ह्यूम पाईप कं., लि.**
बॅलर्ड इस्टेट, मुंबई.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची प्रमुख प्राव्हिडंट विमा कं.
**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**
च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.
किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.


**MARATHE & Co.**

ENGINEERS & IRON FOUNDERS

| WORKS : | | OFFICE : |
|---|---|---|
| Natu Bag, Bhikardas Road, POONA 2 | Can undertake to do any sort of casting. We also manufacture WEIGHTS according to the Bombay Weights & Measures Act. **Our prices are very competitive.** | 978-79, Sadashiv, POONA 2 |

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन हें मॉडेल बनविलें आहे.



किंमत माफक.

पंप नाहीं ! पिन् नाहीं ! ! आवाज नाहीं ! ! !

ज्युनियर प्रभाकर

सेफ्टी स्टोव्ह

माहितीपत्रक मागवा

मेकर्सः—ओगले ग्लास वर्क्स., लि.

ओगलेवाडी, ( सं. औंध ), जिल्हा सातारा.

पुणें स्टॉकिस्ट्सः—

१ केळकर ब्रदर्स, बुधवार चौक.

२ म. इं. को. ऑ. एजन्सी, लक्ष्मीरोड.

# विविध माहिती

### टेलिफोनचे दर उतरत नाहींत

सरकारचें टेलिफोन खातें फायद्यांत असलें, तरी टेलिफोनचे दर उतरविण्याइतका त्यास नफा उरत नाहीं, असें सर फ्रँक नॉईस ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### राष्ट्रसभेचें अधिवेशन

फैजपूर येथें भरणाऱ्या हिंदी राष्ट्रसभेच्या अधिवेशनाच्या तारखा २७, २८ व २९ डिसेंबर अशा तूर्त निश्चित करण्यांत आल्या आहेत.

### मुंबई शहरांतील डांबरी रस्ते

मुंबई शहरांतील सार्वजनिक रस्त्यांची लांबी २२२ मैल भरते. त्यांपैकीं, ५६ मैल लांबीचे रस्ते डांबरी आहेत.

### राणीच्या बागेची लोकप्रियता

मुंबई येथील राणीच्या बागेस गेल्या वर्षी एकूण २४½ लक्ष लोकांनीं भेट दिली, म्हणजे रोजची सरासरी ६,७२३ अशी पडली.

### मुंबई शहरांतील रेकॉर्ड जननसंख्या

गेल्या वर्षी मुंबई शहरांत एकूण ३४,४२८ अर्भकें जन्मास आलीं. म्हणजे, दर हजार लोकवस्तीशीं जननाचें प्रमाण २९.६ इतकें पडलें. मुंबईमधील जननाच्या आकड्यांचे बाबतींत हें रेकॉर्ड आहे.

### जर्मनीनें परदेशांत चालवलेला मतप्रचार

जर्मनींतल्या नात्सी पक्षानें आपलीं मतें व कार्य ह्याविषयींचा प्रचार बाहेरच्या देशांत जोरानें चालवला आहे. १९३५ सालीं निरनिराळ्या भाषांत त्याबाबत एकूण ६५ लक्ष हस्तपत्रकें छापलीं गेलीं व त्यांतलीं ५० लक्ष परदेशांत धाडण्यांत आलीं. ह्याशिवाय ५ टन वजनाचीं पुस्तकें व चोपडीं पाठविलीं तीं वेगळींच.

### बगदादच्या नगररचनेकरितां जर्मन सल्लागार

बगदाद शहराची सुधारलेल्या पद्धतीनें मांडणी व्हावयाचें ठरलें असून नगररचनेसंबंधानें सल्ला देण्यासाठी जर्मनींतले प्रोफेसर ब्रिक्स ह्यांची नेमणूक झाली आहे.

### पोलंडला फ्रान्सची आर्थिक मदत

लढाऊ खर्च व व्यापारवृद्धि ह्यांसाठी पोलंडला कर्जाऊ भांडवल पुरवण्याचें व इतर सवलती देण्याचें फ्रान्सनें कबूल केलें आहे.

### हिंदुस्थानांतील उंसाची लागवड वाढली

१९३५–३६ च्या पेक्षां १९३६–३७ ची हिंदुस्थानांतील उंसाची लागवड १५ टक्क्यांनीं ज्यास्त आहे,असा अधिकृत अंदाज आहे. ४२ लक्ष ३२ हजार एकरांत ऊंस लावला जाईल अशी अपेक्षा आहे.

### अमेरिकेचें राष्ट्रीय कर्ज

अमेरिकेंत राष्ट्रीय सरकारास सुमारें ८,२५० कोटि रुपयांचें कर्ज आहे. ह्याशिवाय प्रांतिक सरकारें व स्थानिक संस्था ह्यांच्या कर्जाची रकम सुमारें ६,८०० कोटि रुपये होते, ती निराळीच.

### जर्मनींत पांच लक्ष गुन्हेगार व आरोपी सुटले

नात्सी सरकारविरुद्ध किरकोळ गुन्हे केल्याबद्दल शिक्षा झालेल्या अडीच लक्ष लोकांस हेर हिटलर ह्यांच्या हुकुमावरून सोडून देण्यांत आलें आहे आणि दुसऱ्या अडीच लाख आरोपींवरचे खटले काढून घेण्यांत आले आहेत.

### हिंद-जपान करार ३१ मार्च रोजीं संपणार !

३१ मार्च १९३७ रोजीं हिंद-जपान कराराची मुदत संपणार असून त्याप्रमाणें हिंदुस्तानातर्फे जपानला औपचारिक रीतीनें कळविण्यांत आलें आहे. सिमला येथें चालू असलेल्या नव्या करारासंबंधींच्या वाटाघाटी यशस्वी होतील, अशी आशाहि त्या खलित्यांत व्यक्त करण्यांत आली आहे.

### दंग्यांतील लूट व विमा कंपन्या

१९३२ सालीं मुंबई शहरामध्यें हिंदू-मुसलमानांचा दंगा झाला त्यावेळीं जाळपोळ, लूट इत्यादिसंबंधीं २४ लक्ष रुपयांचे क्लेम्स विमाकंपन्यांकडे दाखल झाले होते. सध्याच्या दंग्यामध्यें लुटीचें प्रमाण अधिक आहे व त्याबाबत विमा कंपन्यांकडे क्लेम्स येत आहेत. १४ आक्टोबर पासून कंपन्यांनीं आपल्या हप्त्याचा दर जादा धोक्याचे मुदतीमध्यें चौपट केला आहे.

### लंडनच्या रोखे बाजारांत हिंदी भागांचा प्रवेश

इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कंपनीच्या भागांचा रोजचा दर लंडन स्टॉक एक्सचेंजमध्यें व्यवहार केल्या जाणाऱ्या रोख्यांचे किंमतीचे पत्रकांत ह्यापुढें समाविष्ट केला जाणार आहे. ही सवलत इंपीरियल बँक, रिझर्व्ह बँक, न्यू इंडिया विमा कंपनी, टाटा आयर्न ॲन्ड स्टील, टिटाघर कागद व कांहीं सिमेंट कंपन्या ह्यांच्या भागांस मिळावी, असें मि. एन आर. सरकार ह्यांनीं एका मुलाखतींत आपलें मत दिलें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| ता. १७ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ८७,०७,४४५ |
| ता. २४ ऑक्टोबर रोजीं पुरा झालेला आठवडा | ३७,४६,७७२ |
| ता. २१ सप्टेंबर १९३१ ते २४ ऑक्टोबर १९३६ अखेर | २,८५,३६,१३,३७५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५२८ | ५ थकवा घालविण्यासाठी विश्रांतीचें महत्त्व ... | ५३२ |
| २ हुंडणावळीचा जम बसला, पुढें काय? ... | ५२९ | ६ जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी | ५३३ |
| ३ प्रो. काळे ह्यांची सांगली येथील व्याख्यानें ... | ५३० | ७ सर जॉन एलरमन ह्यांची मालमत्ता ... ... | ५३३ |
| ४ स्फुट विचार. ... | ५३१ | ८ सहकारी चळवळ ... | ५३४ |
| ब्रिटिश रेल्वे तज्ञ हिंदी रेल्वेजची चौकशी करणार–बाहेरील तज्ञांच्या नेमणुकीचें समर्थन–हास्यास्पद कोटिक्रम-आयरिश स्वदेशी धंदे व परकीय भांडवल–फळें व भाज्या ह्यांच्या विक्रीसाठी बोर्ड. | | ९ आजचा ॲबिसीनिया | ५३५ |
| | | १० खेडुतांच्या रहाणींत सुधारणा ... ... | ५३६ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ५३७ |
| | | १२ पोस्टांतील निर्जीव खातीं | ५३७ |


# अर्थ

बुधवार, ता. २८ ऑक्टोबर, १९३६

## हुंडणावळीचा जम बसला, पण पुढें काय?

फ्रान्स, स्वित्सर्लंड व हॉलंड ह्या राष्ट्रांनीं आपल्या चलनांचा सोन्याशीं असलेला संबंध ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांच्या चलनाशी जुळता करून घेतला ही जगाच्या आर्थिक इतिहासांत गेल्या सहा वर्षांत घडून आलेली अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. सप्टेंबर, १९३१ मध्यें ग्रेट ब्रिटननें आपल्या पौंडाचें परिमाणभूत सोन्याचें कायदेशीर वजन सोडून दिलें आणि हुंडणावळीचा दर अस्थिर राहिला तरी हरकत नाहीं असें ठरविलें. हुंडणावळीचा कायदेशीर दर निश्चित असला म्हणजे त्या दरानें सोन्याची खरेदी-विक्री करण्याची जबाबदारी राष्ट्रीय मध्यवर्ती बँक व सरकार ह्यांवर येते. १९२९ सालीं विशेषेंकरून अमेरिकेंत जी आर्थिक घडामोड झाली तिच्या योगानें जागतिक व्यापार व आंतरराष्ट्रीय देवघेव ह्यांस नवीन वळण लागलें आणि पूर्वी ठरलेल्या दरानें सोनें किंवा परराष्ट्रीय हुंड्या ह्यांची खरेदी-विक्री होण्यास जरूर असलेला सुवर्णनिधि पुरवणें अशक्य आहे असें दिसून आल्याकारणानें बँक ऑफ इंग्लंडला आपल्या जबाबदारींतून ब्रिटिश पार्लमेंटनें मोकळें केलें. ह्याचा परिणाम सोन्याची किंमत पौंडांमध्यें चढण्यांत झाला, आणि इंग्लंडची अमेरिकेशी असलेली हुंडणावळीची व्यवस्था बिघडली. आंतरराष्ट्रीय व्यापारांतल्या देण्याघेण्याची वजावाट परस्परांवर निघालेल्या हुंड्यांच्या सहायानें होऊन अल्प प्रमाणांतच ह्यासंबंधांत सोन्याची आयात-निर्गत करावी लागावी अशा बेतानें हुंडणावळीचे दर व राष्ट्रीय चलनांचें सुवर्ण-परिमाण हीं निश्चित केलेलीं असतात. पौंडाची सोन्यामधली किंमत बदलतांच त्याचा अनिष्ट परिणाम आपला व्यापार व उद्योगधंदे ह्यांवर होऊं नये म्हणून अमेरिकेनें आपल्या स्वतःच्या सुवर्ण परिमाणांत योग्य तो बदल केला आणि पौंड-डॉलर हुंडणावळ विशिष्ट दरानें स्थिर झाली. आपापल्या हिताच्या संरक्षणार्थ, फ्रान्स, स्वित्सर्लंड व हॉलंड ह्या व्यतिरिक्त इतर राष्ट्रांनीं इंग्लंड व अमेरिका ह्यांचें अनुकरण तात्काल केलें. जगाच्या व्यापारास न जुळणारा असा परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर घट्ट धरून बसण्यांत फ्रान्सचें स्वतःचें नुकसान होत होतें. १ पौंड = ७५ फ्रँक हा दर वाजवीपेक्षां जास्त उंचीचा होता आणि त्या दरानें फ्रँक कायम राखण्याकरितां फ्रेंच सरकारास देशांतलें खेळतें चलन मर्यादित करावें लागत असे. चलन मर्यादित झालें असतां बाजारभाव मंदीचे होतात आणि व्यापार व उद्योगधंदे खालावतात. हे दुष्परिणाम सोसून फ्रँकच्या जुन्या दरास चिकटून राहण्याचा हट्ट फ्रान्सनें आतां सोडला आहे आणि त्या कारणानें आंतरराष्ट्रीय हुंडणावळीची घडी नीट बसण्यास सहाय झालें आहे.

फ्रँकची देवघेव, त्यामध्यें ६५½ मिलिग्रॅम वजनाचें सोनें आहे ह्या कल्पनेनें पूर्वी होत असे; आतां हें परिमाण कमी होऊन फ्रेंच सरकारनें ४३ ते ४९ मिलिग्रॅम इतकें निश्चित करण्यास कायदे मंडळाची मंजुरी मिळवली आहे. ह्या बदललेल्या परिमाणास अनुसरून फ्रँक-डॉलर हुंडणावळ पूर्वी १ डॉलर=१५ फ्रँक अशी होती ती ह्यापुढें १ डॉलर = २० ते २३ फ्रँक ह्याप्रमाणें व्हावयाची आहे. डॉलर–पौंड–फ्रँक हुंडणावळीचे दर अखेर कसे निश्चित होतील हें आज सांगतां येत नाहीं, तथापि त्यांस विशिष्ट मर्यादा येऊन बसल्या आहेत हें खास. स्वित्सर्लंडच्या फ्रँकचें सुवर्ण परिमाण पूर्वी २९० मिलिग्रॅम होतें, तें १९० ते २१५ मिलिग्रॅमच्या सुमारांत निश्चित व्हावयाचें आहे; म्हणजे त्या चलनाची सोन्यानें मापलेली किंमत २६ ते ३५½ टक्के उतरणार आहे आणि हा उतार फ्रेंच फ्रँक इतकाच होणार आहे. हॉलंडनें सोन्याची निर्गत बेकायदेशीर केली आहे आणि आपल्या चलनाच्या किंमतीचें रक्षण व्हावें म्हणून जरूर ती तजवीज केली आहे. ह्याप्रमाणें जगांतलि प्रमुख राष्ट्रांनीं आपापलीं चलनें व परराष्ट्रीय हुंडणावळीचे दर जागतिक परिस्थितीशीं मिळते केले आहेत. प्रचलित आर्थिक मंदी दूर होण्यास अनुकूल वातावरण पाहिजे तें घडवून आणण्याची ही केवळ पहिली पाहिरी आहे. १९३१ सालापूर्वी राष्ट्रीय चलनें व सोनें ह्यांचा विनिमय सहज होत असे, त्या तऱ्हेची सुवर्णमापन चलनाची व आंतरराष्ट्रीय हुंडणावळीची पद्धति पुन्हां पूर्णत्वानें चालू झाली किंवा होणार असें अनुमान काढणें मात्र चुकीचें होईल. आंतरराष्ट्रीय व्यापार घटला आहे. त्यांत व राष्ट्रीय उद्योगधंद्यांत नवचैतन्य उत्पन्न होण्यास हुंडणावळीची स्थिरता हें एक दुय्यम साधन आहे. जगाची राजकीय परिस्थिति सुधारून राष्ट्रांमध्यें परस्परांविषयीं अविश्वास वास करीत आहे तो दूर होणें ही प्रस्तुत अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. भावी युद्धाच्या तयारींत आणि भावी शत्रूपासून स्वतःचें संरक्षण कसें करावें ह्या विवंचनेंत प्रमुख युरोपिअन राष्ट्रें आहेत तोंवर आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गांतले अडथळे दूर होणें शक्य नाहीं. जिनीव्हा येथें राष्ट्रसंघाच्या एका कमिटीची सभा चालू महिन्याच्या प्रारंभीं भरली होती, तीमध्यें ग्रेटब्रिटन व फ्रान्स ह्यांच्या प्रतिनिधींनीं आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गांत कित्येक देशांत नियंत्रणें घातलेलीं आहेत, तीं काढून घेणें अगत्याचें आहे, ह्या मुद्यावर विशेष जोर दिला, तो ह्याच कारणासाठी होय. जर्मनीसारख्या देशांत आर्थिक स्वयंपूर्ततेचें धोरण अंगिकारण्यांत आलें असून निरनिराळ्या राष्ट्रांशीं व्हावयाच्या व्यापारास व हुंडणावळीच्या व्यवहारास मर्यादा घातल्या

आहेत, त्यांवर कमिटींतल्या फ्रेंच प्रतिनिधीचा कटाक्ष होता. चार वर्षांच्या अवधींत आपणांस लागणारा कच्चा माल स्वतःच तयार करावयाचा व त्या बाबतींत इतर देशांवर अवलंबून रहावयाचें नाहीं, अशी स्थिति निर्माण होण्याकरितां जर्मनीनें चतुर्वार्षिक योजना हातीं घेतली असल्याचें जाहीर झालें आहे. आपल्या वसाहती आपणांस परत मिळण्याबाबतची जर्मनीची मागणी आहे, तिचाहि निकाल समाधानकारक रीतीनें व्हावा लागेल. स्पेनमधल्या अंतःकलहामुळें युरोपांत तेढ उत्पन्न झाली आहे तीहि आर्थिक मंदी दूर होण्याच्या मार्गांतली एक अडचण आहे. हुंडणावळीच्या स्थिरतेनें आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मार्ग मोकळा झाला असला तरी त्यांत मोठमोठे खड्डे आहेत, ते भरून निघतील तेव्हांच खऱ्या आर्थिक प्रगतीस जोर लागेल. जागतिक व्यापाराच्या गाडीच्या चाकांत हुंडणावळाच्या स्थैर्याचें ओंगण घातलें जात आहे, परंतु ती पुढें ढकलली जाण्यास सर्व राष्ट्रांचें बळ एकवटलें पाहिजे.

## प्रो. काळे ह्यांचीं सांगली येथील व्याख्यानें

सांगली येथील सिटी स्कूलच्या चालकांनीं गेल्या आठवड्यांत शारदोत्सवानिमित्त वुइलिंग्डन कॉलेजचे मुख्य, प्रि. कर्वे आणि प्रो. काळे ह्यांच्या व्याख्यानांचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पाडला. व्याख्यानास गांवांतील निरनिराळ्या धंद्यांच्या व पेशांच्या गृहस्थांची गर्दी होत असून श्रोत्यांमध्यें जिज्ञासा व उत्साह उत्कृष्ट रीतीनें व्यक्त होत होता, ह्याबद्दल शाळेचे चालक व सांगलीची जनता ह्या दोघांचेंहि अभिनंदन करणें जरूर आहे. प्रि.कर्वे ह्यांचें व्याख्यान 'फेडरेशन' ह्या विषयावर झालें आणि प्रो. काळे ह्यांच्या व्याख्यानांचे विषय 'हुंडणावळीची खळबळ' व "जागतिक आर्थिक घडामोडी" हे होते. हे सर्वच विषय हिंदी जनतेस सध्या अत्यंत जिव्हाळ्याचे वाटत असल्यानें सांगलीकरांस त्यांवरील व्याख्यानें विशेष अभिप्रेत वाटलीं असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

### हुंडणावळीची खळबळ

फ्रेंच सरकारानें आपल्या राष्ट्रीय चलनाची डॉलर व पौंड ह्यांचे मानानें स्वस्ताई नुकतीच केली असून फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्यांचे दरम्यान हुंडणावळीचे दर स्थिर करण्याचे यत्न चालू आहेत, ह्या सर्व घडामोडींचें रहस्य प्रो. काळे ह्यांनीं आपल्या पहिल्या व्याख्यानांत विशद करून सांगितलें. हुंडणावळ म्हणजे काय, तिच्या दराचा राष्ट्रीय चलनाशीं संबंध कसा असतो, त्यांचा बाजारभावावर परिणाम कसा घडून येतो, ह्याची व्याख्यात्यांनीं अत्यंत सुलभ रीतीनें फोड केली आणि हुंडणावळीचा प्रश्न राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा कां व कसा होतो, हें उदाहरणें घेऊन श्रोत्यांस पटवून दिलें. जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपल्या चलनाचें सोन्याचें माप कमी केलें आहे त्याचा परिणाम बाजारभाव,उद्योगधंदे व व्यापार ह्यांवर अनुकूल झाला असून फ्रान्स, स्वित्सर्लंड, हॉलंड वगैरे देशांस इंग्लंड व अमेरिका ह्यांचें अनुकरण करून स्वतःच्या चलनाची त्यांच्या चलनांतली किंमत म्हणजे हुंडणावळ जुळती करून घेण्यापासून काय फायदा होणार आहे, ह्याचेंहि त्यांनीं विवेचन केलें. हिंदुस्थान सरकारनेहि राष्ट्रीय व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या हिताच्या दृष्टीनें अशाच प्रकारच्या धोरणाचा अंगिकार करणें अगत्याचें होतें; परंतु आमच्या देशांत आर्थिक बाबींत स्वावलंबनाची सत्ता नसल्यानें हिंदी रुपया ब्रिटिश पौंडास डांबून ठेवून स्वस्थ बसण्याची पाळी आली आहे.

### जागतिक आर्थिक घडामोडी

प्रो. काळे ह्यांच्या दुसऱ्या व्याख्यानांत अलीकडे जगांत आर्थिक घडामोडी मोठ्या प्रमाणावर चालल्या आहेत, त्यांचें विवेचन करण्यांत आलें. प्रत्येक राष्ट्रानें इतरत्र होणाऱ्या ह्या उलाढाली लक्षांत घेऊन स्वतःचें उचित असें औद्योगिक व व्यापारी धोरण आखणें अगत्याचें आहे, ह्या आपल्या मुख्य सिद्धांताच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनीं चलनव्यवस्था, औद्योगिक संरक्षण, आंतरराष्ट्रीय व्यापारी करार, आर्थिक स्वयंसिद्धता, आर्थिक योजना, इत्यादि बाबतींत गेल्या पांच-दहा वर्षांत इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत होत असलेले महत्वाचे फेरफार स्पष्ट करून सांगितले. आंतरराष्ट्रीय सहकार व राष्ट्रीय वृत्तीचे स्वावलंबी धोरण ह्यांचा परस्पर संबंध सध्या पूर्वीच्या मानानें निराळ्या प्रकारचा झालेला आहे. एकमेकांशी व्यापारासारख्या बाबतींत राष्ट्रांनीं सहकार तर केलाच पाहिजे,त्यावांचून त्यांचें क्षणभरहि चालणार नाहीं, परंतु हा सहकार प्रत्येक राष्ट्राच्या विशिष्ट परिस्थितीशी सुसंगत असला पाहिजे. पूर्वीप्रमाणें राष्ट्रांच्या सरकारांस आर्थिक प्रश्नांचे बाबतींत तटस्थपणाची वृत्ति स्वीकारून भागत नाहीं, हें ग्रेट-ब्रिटनसारख्या खुल्या व्यापाराच्या चहात्या राष्ट्रांत शेती, व्यापार व उद्योगधंदे ह्यांस संरक्षण देण्याचें महत्त्व व्यवहारांत पटलें आहे, ह्यावरून सिद्ध होत आहे. हिंद-जपान करार, ओटावा करार, जर्मनीची आर्थिक स्वयंसिद्धतेसंबंधाची योजना ह्यांचे दाखले देऊन व्याख्यात्यांनीं हा विषय विशद केला. हिंदी सरकार व हिंदी जनता यांनीं प्रचलित जागतिक घडामोडींपासून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे, तो कोणता तोहि प्रो. काळे ह्यांनीं स्पष्ट सांगितला. आत्मविश्वास, प्रगतीचें ध्येय व संघटन ह्यांच्या सहायानें हिंदी जनतेनें स्वदेशीचा अंगिकार केला पाहिजे व स्वतःच्या पायावर उभें रहाण्याची तयारी केली पाहिजे. असें होईल तरच हा देश आंतरराष्ट्रीय चढाओढींत जगेल.

## जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण : पंजाब सरकारचें बिल

मध्यप्रांतांतील १९२८ च्या कनसॉलिडेशन ऑफ होल्डिंग्ज अॅक्टाच्या धर्तीवर वरील बिलाची योजना करण्यांत आली आहे. एकाद्या ठिकाणच्या तीन चतुर्थांशापेक्षां जास्त जमीन धारण करणाऱ्या व एकूण जमीन मालकांच्या दोन तृतीयांशांपेक्षां ज्यास्त मालकांनीं जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्यांत यावें असा अर्ज केल्यास तो अर्ज सर्व मालकांतर्फे आहे असें मानण्यांत येईल व त्यांनीं मंजूर केलेली योजना सर्वांवर बंधनकारक होईल, अशी वरील बिलांत तरतूद करण्यांत आली आहे. वेगवेगळ्या ठिकाणीं विखुरलेल्या एकाच मालकीमधील जमिनीच्या तुकड्यांचे ऐवजीं एकेठिकाणीं त्यांच्या क्षेत्रफळाइतकी जमीन मालकास प्राप्त करून देणें, म्हणजे जमिनीची अदलाबदल करणें, एवढाच वरील बिलाचा मर्यादित उद्देश आहे. ह्याच स्वरूपाचें एक बिल मुंबई सरकारनें कायदेमंडळांत मागें आणलें होतें, परंतु तें लोकांच्या विरोधामुळें परत घ्यावें लागलें होतें.

## फर्ग्युसन आणि विलिंग्डन कॉलेज मॅगेझिनचा डॉ. परांजपे ज्युबिली विशेषांक

फर्ग्युसन कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल 'रँगलर' परांजपे ह्यांच्या षष्ठ्यब्दपूर्तीचे प्रसंगानुसार वरील अंकाची सजावट करण्यांत आली आहे. डॉ. परांजपे ह्यांच्या आठवणींनीं हा अंक भरला असून अनेक पुढाऱ्यांचे व फर्ग्युसन कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचे लेख त्यांत समाविष्ट आहेत. सदरहु अंकावरून डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या परिवाराची व डॉ. परांजपे ह्यांच्या कार्याची व लोकप्रियतेची कल्पना येते.

## स्फुट विचार

### ब्रिटिश रेल्वे तज्ञ हिंदी रेल्वेजची चौकशी करणार

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या म्हणजे हिंदी राष्ट्रीय रेलवेजची सांपत्तिक स्थिति सर्वस्वी बिघडून गेली असून त्यांचा व्यवहार गेलीं सहा वर्षे तोट्यांत चालला आहे. प्रचलित आर्थिक मंदीचा हा पुष्कळ अंशीं परिणाम आहे, ह्यांत शंका नाहीं. तथापि, बिघडलेली स्थिति मामुली उपायांनीं सुधारणें अशक्य वाटल्यावरून सरकारनें रेलवेजच्या व्यवस्थेंत महत्त्वाचे फेरफार होणें जरूर आहे ह्या समजुतीनें त्या बाबतींत चौकशी व शिफारसी करण्यासाठीं दोन ब्रिटिश तज्ञांची नेमणूक केली आहे. रेलवेजचा कारभार धंदेवाइक पद्धतीप्रमाणें चालला पाहिजे हें निर्विवाद आहे. कर्जाऊ भांडवल उभारून त्या बांधल्या आहेत व त्यांतलें पुष्कळसें कर्ज परदेशी भांडवलवाल्यांचें आहे. रेलवेजचा मामुली खर्च भागून भांडवलावरचें व्याज देण्यास आणि घसारा काढून ठेवण्यास पुरी कूस राहील ह्या बेताचें त्यांचें उत्पन्न आलें पाहिजे. एवढेंच नव्हे, तर हा सर्व खर्च भागून भांडवलावर रीतसर नफाहि उरणें जरूर आहे. असें होईल तरच रेलवेजचा कारभार नीट चालला असें म्हणतां येईल. सहा वर्षांपूर्वी अशी स्थिति होती आणि सर्व खर्चवेंच जाऊन सरकारी तिजोरींत पांच-चार कोटि रुपये दर वर्षी नफ्यादाखल जमा होत असत. अलीकडे हें पारडें सर्वस्वी फिरलें असून, नफा दूर राहिला, पण पुरत्या घसाऱ्याची तरतूद करणेंहि अशक्य झालें आहे. मोडतोड भरून निघण्याची आणि मूळ भांडवल अखंड रहाण्याची व्यवस्था कोणत्याहि व्यवसायांत मामुली उत्पन्नामधून होत नसेल तर तो धंदाच नव्हे. हिंदी रेल्वेज राष्ट्राच्या मालकीच्या असल्यानें त्या नुकसानींत चालणें अनिष्टच समजलें पाहिजे. रेलवेजची स्थिति सुधारण्याच्या स्वतःच्या प्रयत्नांस यश येत नाहीं असें पाहून रेल्वे बोर्डानें हात टेकले असून विलायती तज्ञांकडे धांव घेतली आहे. आमच्या रेल्वेजच्या व्यवस्थेची प्रकृति तपासून योग्य उपाययोजना सुचवा आणि हा रोगी स्वतःच्या पायांवर उभा राहून चालूं लागेल असें करा ह्या प्रकारची कामगिरी सरकारनें त्यांच्यावर सोपविली आहे. गेलीं ऐंशी वर्षे हिंदुस्थानांत रेलवेज चालू असतां त्यांसंबंधांत सल्ला देण्याची पात्रता असलेले दोन गृहस्थहि येथें सरकारास सापडूं नयेत ही नवलाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. प्रत्येक बाबतींत हिंदुस्थान सरकारास बाहेरील तज्ञांकडे धाव घेणें जरूर वाटावें हें कांहीं भूषणावह नाहीं.

---

### बाहेरील तज्ञांच्या नेमणुकीचें समर्थन

हिंदी रेल्वेजच्या दुःस्थितीची चौकशी करण्यास दोन ब्रिटिश तज्ञ नेमले आणि त्यांच्या जोडीस एकहि हिंदी गृहस्थ दिला नाहीं, ह्या विषयींच्या सरकारच्या धोरणावर प्रतिकूल टीका होणें ही गोष्ट अपेक्षितच होती. तेव्हां, तिला काय उत्तर द्यावें हें सरकारच्या धोरणाचें समर्थन करणारांनीं आपल्या मनाशीं ठरवूनच ठेवलें असलें पाहिजे. सर राल्फ वेजवुड त्यांच्या जोडीनें बसून काम करण्यास लायक असा एकहि हिंदी गृहस्थ मिळणें अशक्य आहे असें विधान करणें कोणासहि धाष्ट्याचें वाटलें असतें. तेव्हां दुसऱ्याच कांहीं मुद्यांवर सरकारी धोरण उचलून धरलें जाणें भाग आहे. मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राच्या सिमल्याच्या बातमीदारानें ह्या बाबतींत कोटिक्रम केला आहे, तो वाचला म्हणजे हिंदी रेल्वेजच्या चौकशीसाठीं केवळ ब्रिटिश तज्ञ नेमण्याच्या मुद्याशीं असलेल्या कल्पना किती भ्रामक आहेत ह्याची कल्पना येते. सदरहु बातमीदारानें सिमला येथील अधिकारी वर्गांतलें मत अजमावूनच त्याची दिशा निदर्शित केली आहे यांत शंका नाहीं. ब्रिटिश रेल्वेजच्या कारभाराची व त्यामध्यें सुधारणा घडवून आणून मंदीच्या परिस्थितींतून त्यांस बाहेर काढण्यासाठीं अमलांत आणलेल्या उपायांची उत्कृष्ट माहिती सर राल्फ ह्यांस आहे आणि हिंदी रेल्वेजच्या दुःस्थितीचें निदान करण्यास ते धैर्यानें पुढें आले आहेत असें ह्मणून हिंदुस्थान सरकारचें मन उघडें करून दाखविण्याचा यत्न सदरहु लेखकानें केला आहे. बाहेरून येणारे तज्ञ चांगले माहितगार, हुषार व लायक गृहस्थ असतील ह्याविषयीं शंका घेण्याचें किंवा त्यांच्याविरुद्ध निष्कारण टीका करण्याचें कोणासच प्रयोजन नाहीं. हिंदी आर्थिक प्रश्न सोडवण्यास योग्य अशीं हिंदी माणसें नाहींत कीं काय आणि त्यासंबंधांतलें परावलंबन किती काळपर्यंत व कोणत्या मर्यादेपर्यंत चालावयाचें हा येथें प्रश्न आहे. परकीय तज्ञांच्या नेमणुकीमुळें हिंदी राष्ट्रावर नालायकीचा शिक्का बसत आहे ह्याची जाणीव निदान हिंदुस्थान सरकारास असावयास पाहिजे होती.

---

### हास्यास्पद कोटिक्रम

हिंदी रेल्वेंत गुंतलेलें भांडवल बहुतांशीं ब्रिटिश मालकीचें असल्यानें त्यांच्या स्थितीविषयींच्या चौकशीचें काम ब्रिटिश तज्ञांच्या हातीं देणें आवश्यक होतें, हा हास्यास्पद मुद्दा वरील लेखकानें पुढें मांडला आहे. सर राल्फ वेजवुड हे ब्रिटिश भांडवलवाल्यांचे प्रतिनिधि व त्यांच्या हिताचे रक्षक ह्या नात्यानें अंगीकृत चौकशीचें काम करणार आहेत असें म्हणणें खुद्द सरकारास आणि सर राल्फ ह्यांस कितीसें रुचेल ह्याची शंका आहे. रेल्वेजचा खर्च कसा कमी करावा, त्यांचें उत्पन्न कसें वाढवावें, जरूर वाटल्यास त्यांच्या कारभाराची पुनर्घटना कशी करावी इत्यादि प्रश्नांचीच मुख्यत्वेंकरून चौकशी व्हावयाची असतां ब्रिटिश भांडवलाचा त्यांच्याशीं कसा संबंध येतो हेंच समजणें कठिण आहे. ब्रिटिश भांडवलावर व्याज द्यावें लागतें तें कमी करून हिंदी रेल्वेजचा कारभार कमी खर्चाचा करावा असें कोणीहि सुचवलेलें नाहीं, आणि तसें सुचवलें गेलें आहे असें क्षणभर मानलें तरी त्या बाबतींत सर राल्फ सारखे तज्ञ कसा सल्ला देणार? ह्यासंबंधानें सल्ला देण्याची त्यांच्यामध्यें कोणती पात्रता आहे? हिंदी रेल्वेजच्या स्थितीशीं हिंदी जनतेचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असे असतां, तिचे प्रतिनिधि बाजूस सारून ब्रिटिश भांडवलवाल्यांच्या हिताचें रक्षण करण्याकरितां त्यांच्या प्रतिनिधींची निवड करण्यांत आली आहे हा टाइम्सच्या बातमीदाराचा मुद्दा स्वतः त्या भांडवलवाल्यांसहि रुचणार नाहीं. ह्या बातमीदाराचा ह्या पुढचाहि कोटिक्रम अत्यंत लटपटीत आहे. रेल्वे बोर्ड आणि हिंदुस्थानांतील कंपन्यांच्या रेल्वेज ह्यांचेमध्यें प्रस्तुत हलाखीच्या स्थितीचे बाबतींत मतभेद असल्यानें त्याबाबत निःपक्षपाती व निर्णयात्मक मत देण्यास ब्रिटिश तज्ञांसारखे तिऱ्हाइतच ज्यास्त उपयोगी पडतील ह्या त्याच्या म्हणण्यांतहि कांहीं तथ्य नाहीं. आंतरराष्ट्रीय व आंतरप्रांतीय व्यापाराच्या ओघास अलीकडे नवीन वळण लागलें आहे आणि रेल्वेज व मोटारी ह्यांची परस्पर स्पर्धा चालू आहे; ह्या प्रश्नांचें

आकलन व निकाल करण्यास बाहेरचे तज्ज्ञ हवे आहेत असें नाहीं. परंतु परकीय तज्ज्ञांचें खूळच हिंदुस्थानांत इतकें पिकलें आहे कीं सरकाराचा व जनतेचा जणूं काय आत्मविश्वासच नाहींसा झाला आहे. कोणत्याना कोणत्या कारणानें, हिंदी लोक स्वतःच्या हिताचे प्रश्न सोडवण्यास लायक नाहींत ही कल्पना दृढमूल झाली असून तिचें मूळ अधिक घट्ट करण्याचा चोहोंकडून प्रयत्न होत आहे असें एकंदर परिस्थिति पहातां वाटावयास लागतें. जनतेमध्यें प्रथम आत्मविश्वास उत्पन्न झाल्यावांचून सरकारावर तिच्या मताचें वजन पडणें शक्य नाहीं.

### आयरिश स्वदेशी धंदे व परकीय भांडवल

आयर्लंडमध्यें राष्ट्रीय भावना विशेष प्रदीप्त झाल्यापासून परदेशी भांडवलवाले व कारखानदार ह्यांचें प्रस्थ आपल्या देशांत चालूं द्यावयाचें नाहीं असें तेथील लोक व सरकार यांनीं ठरवून त्या बाबतींत नियंत्रणें घालण्यासाठीं जरूर ते कायदे पास केले. तथापि हीं नियंत्रणें चुकवूनहि परराष्ट्रीय कारखानदार आयर्लंड-मध्यें धंदे चालवतात असें आढळून आलें असून त्याचा बंदोबस्त व्हावा म्हणून राष्ट्रीय धंदेवाल्यांच्या संघानें सरकारास कित्येक सूचना केल्या आहेत व त्यांस अनुसरून नवीन कायदे केले जावे असें त्यांचें म्हणणें आहे. परदेशी भांडवलवाले प्रचलित निर्बंध निरनिराळ्या हिकमती लढवून चुकवतात. आयर्लंडमध्यें थोड्या भांडवलाचा लहान कारखाना निघतो व त्याचे चालक आयरिश लोक असतात. परंतु कारखान्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर चालून त्यास लागणारें जादा भांडवल बाहेरून कर्जाऊ पुरवलें जातें किंवा तें कच्च्या मालाच्या स्वरूपांत परकीय मंडळया देतात आणि ह्या मार्गानें परराष्ट्रीय लोकांचा हात आंत शिरकतो. उदाहरणार्थ, सात हजार रुपये भांडवलावर निघालेल्या एका कारखान्याचें वार्षिक उत्पादन पावणेतीन लक्ष रुपयांचें झालें, तें ह्या रीतीनें झालें. ह्या दाखल्यावरून मूळ भांडवल आणि उत्पादनशक्ति ह्यांची माहिती कारखानदारांनीं दिली पाहिजे अशी कायद्यांत तरतूद करण्याविषयीं सूचना पुढें मांडण्यांत आली आहे. नामधारी आयरिश डायरेक्टर परकी भांडवल-वाल्यांच्या वतीनें कंपन्यांचें काम पाहतात असेंहि कित्येक वेळां घडतें व त्या व्यवस्थेंत औद्योगिक सत्ता आयरिश लोकांच्या हातीं रहात नाहीं. परदेशी ट्रेड मार्क्सच्या सहाय्यानें कित्येक कंपन्या माल काढतात व त्याचा सहज खप होतो. आयरिश स्वदेशी कायद्याचें उल्लंघन करणाऱ्या ह्या सर्व प्रकारांचा पूर्ण प्रतिबंध व्हावा अशी शिफारस आयरिश कारखानदारांच्या संघानें सरकारास केली आहे.

### फळें व भाज्या ह्यांच्या विक्रीसाठीं बोर्ड

फळें व भाज्या ह्यांच्या विक्रीच्या मार्गांतील अडचणी दूर करून गिऱ्हाईक वाढविण्याकरितां सहाय करण्यासाठीं मुंबई सर-कारनें एक बोर्ड स्थापन केलें आहे. डॉ. चिमा हे त्याचे अध्यक्ष असून रा. ब. असवले, मुंबईच्या फ्रूट ग्रोअर्स असोसिएशनचे अध्यक्ष मि. बिवडवाला, क्रॉफर्ड मार्केटाचे अधिकारी मि लाड, इलाख्यांतील फळवाल्यांचा व भाजीवाल्यांचा एक प्रतिनिधि व रेल्वेजचा एक प्रतिनिधि हे सभासद रहातील. भाज्या व फळें ह्यांच्या वहातुकीचे दरासंबंधीं बोर्डानें करावयाच्या सूचना मुंबई सरकार व मध्यवर्ती सरकार ह्यांचे मार्फत रेल्वे बोर्डाकडे जातील व नवीन नेमलेल्या चौकशी कमिटीसहि कळवण्यांत येतील, अशी अपेक्षा आहे.

### थकवा घालविण्यासाठीं विश्रांतीचें महत्त्व

आधुनिक द्रुतगतीच्या उत्पादन पद्धतीमध्यें कामगारांस जरूर तेवढी विश्रांति मिळत नाहीं व कामाच्या ताणाचा प्रकृतीस अपाय-कारक परिणाम होऊन त्यांस अकालीं वार्धक्य येतें, ही आतां अनुभवसिद्ध गोष्ट झाली आहे. कामगारांप्रमाणें मालकाचेंहि त्यामुळें नुकसान होतें, कारण नोकरांच्या वारंवार होणाऱ्या गैर-हजेरींत नव्या व अनभिज्ञ माणसांकडून त्यास कामें करून घ्यावीं लागतात. शरीराच्या प्रत्येक हालचालीमुळें होणारी झीज जर भरून निघाली नाहीं व रक्तांत पसरणाऱ्या विषाचें प्रमाण वाढूं लागलें, तर त्यामुळें प्रकृतीस अपाय होतो. संथपणानें काम केलें तर तें ज्यास्त वेळ करतां येतें, परंतु तेंच जलद व विश्रांति न घेतां करावयाचें म्हटलें तर लवकर थकवा येतो. ताशीं तीन मैल वेगानें मनुष्य न थांबतां बारा चौदा मैल जाऊं शकला, तरी एका मैलापेक्षां अधिक धावणें त्यास कठीण जातें व पांच-दहा मिनिटांतच तो धापा टाकूं लागतो, ह्याचें कारण ज्या गतीनें त्याचे रक्तांत विष सांठतें, त्या गतीनें तें बाहेर फेंकलें जात नाहीं, हें होय.

कारखान्यांमध्यें यंत्राप्रमाणें श्रम करणाऱ्या कामगारांस वेळे-वर विश्रांति मिळणें कसें आवश्यक आहे, ह्याची वरील उदाहर-णावरून कल्पना येईल. दोन चार तासांच्या कामाचा थकवा दहा-पंधरा मिनिटांच्या विश्रांतीनें नाहींसा होऊं शकतो व दिवस-भर काम करणारा माणूस रात्रीच्या झोपेनंतर पुनः ताजातवाना होतो. तथापि, कित्येक प्रसंगीं, पहिल्या दिवशींचा थकवा रात्रीच्या विश्रांतीनंतरहि नाहींसा होत नाहीं. मनुष्याच्या शरीराची झीज भरून न आल्यानें आजची ताकद उद्याला रहात नाहीं अशी परिस्थिति निर्माण होते व रोगास प्रतिबंध करण्याची शक्ति नाहींशी होऊन क्षीणता वाढत जाते. थकवा नाहींसा होऊन कामगार पुनः कार्यक्षम होण्यास विश्रांतीची जरूरी आहे आणि ह्या विश्रांतीमध्यें अर्थातच करमणूक, सकस अन्न, नोकरीसंबंधीं निश्चितपणा इत्यादींचा अंतर्भाव होतो. कामगारांची काम करण्याची शक्ती टिकून रहाण्यामध्यें गिरणीमालकांचेंहि हित असल्यानें सुटीची व विश्रांतीच्या वेळेची व्यवस्था त्यांनीं शास्त्र-शुद्ध पायावर केली पाहिजे. फॅक्टरी ॲक्टामुळें मोठमोठ्या कार-खान्यांतील कामगारांच्या कामाच्या वेळा निश्चित झाल्या असल्या व कामाच्या तासांची कमालमर्यादा घालून दिली गेली असली तरी बहुसंख्य लोक फॅक्टरी ॲक्टाखालीं येत नसल्यानें त्यांच्या विश्रांतीची कायदेशीर तरतूद झालेली नाहीं. आपल्या हाता-खालील लोकांस विश्रांति व करमणूक ह्यांचीं साधनें उपलब्ध करून त्यांजकडून गोडीगुलाबीनें ज्यास्त काम करवून घेण्याची कला कित्येक प्रगमनशील कारखानदारांस चांगली साधलेली असते व त्यामुळें मालक व कामगार ह्या दोघांचेंहि हित होतें. अशा व्यापक दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पाहून स्वहित व कामगारांचें हित साधणारें धोरण आंखणारे मालक जितक्या ज्यास्त प्रमाणांत आढळतील त्या मानानें सामाजिक सुखांत वाढ होण्यास सहाय होईल.

### मलेरियाच्या प्रतिकारासाठीं १० लक्ष रुपये

इंडियन रिसर्च फंड असोसिएशननें मलेरिया प्रतिबंधक कार्याकरितां चालू सालासाठीं दहा लक्ष रुपये मंजूर केले आहेत, त्यांपैकीं आठ लक्ष रुपये प्रांतिक योजनांवर खर्च केले जातील.

## जगांतल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी

(१)

महायुद्ध संपून शांतता प्रस्थापित झाल्यावर आंतरराष्ट्रीय संबंध व राष्ट्रांची अंतर्गत सामाजिक व्यवस्था यांची विशिष्ट पद्धतीनें घडी बसली; परंतु अपेक्षेप्रमाणें ह्या पुनर्घटनेंत स्थैर्य निर्माण झालें नाहीं आणि चोहोंकडे नवीन घडामोडी होऊं लागल्या. रशियांत झालेली उलथापालथ अपूर्व अशी होती. प्रातिनिधिक स्वरूपाची राज्यव्यवस्था, खासगी मालकीच्या व स्पर्धेच्या तत्त्वावर आधारलेली शेती व उद्योगधंदे, आधिदैविक व आध्यात्मिक कल्पनांवर उभारलेली धर्माची, विवाहाची व कुटुंबाची व्यवस्था ह्या सर्वांचें उच्चाटन करून बॉल्शेव्हिकांनीं समाजसत्तेची स्वतःस प्रिय असलेली घटना प्रस्थापित केली. पुराणसंस्कृतीचा नाश करणाऱ्या क्रांतीची ही लाट आपल्याकडे उसळूं नये म्हणून जर्मनी व इटली ह्या देशांत फॅसिस्ट लोकांनीं तिचा प्रतिकार करण्याच्या हेतूनें दुसऱ्याच एका प्रकाराची दंडुकेशाही स्थापन केली. आर्थिक मंदीमुळें उत्पन्न झालेल्या हलाखीच्या स्थितीचा परिणाम समाजसत्तावादास इतर देशांतहि उत्तेजन मिळण्यांत झाला. फ्रान्समध्यें कायदेमंडळाच्या गेल्या निवडणुकींत त्या वादाच्या पुरस्कर्त्यांचें प्राबल्य प्रस्थापित झालें आहे व स्पेनमध्यें त्यांचा फॅसिस्ट प्रतिस्पर्ध्यांशी आज निकराचा व रक्तपातमय झगडा चालू आहे. दारिद्र्य, बेकारी, विषमता हीं दूर होण्याचे उपाय सर्वच देशांत अमलांत येत आहेत. पण त्यांच्या तऱ्हा भिन्न भिन्न असून जमीन, कारखाने, बँका, व्यापार इत्यादींची मालकी व व्यवस्था व्यक्तींच्या हातून काढून घ्यावी व ती सामुदायिक व सामाजिक करावी असा समाजसत्तावाद्यांचा आग्रह आहे, तर त्याच्याविरुद्ध, ह्या प्रकारची क्रांति राष्ट्रीय संस्कृति व अस्तित्व ह्यांचा नाश करणारी अतएव त्याज्य आहे, असें इतरांचें ठाम मत आहे. फॅसिस्ट घटना सर्वत्र एकच प्रकारची नाहीं. त्याप्रमाणेंच, समाजसत्तावादात्मक कल्पनांमध्येंहि अनेक तऱ्हा आहेत. रशियांतला बॉल्शेव्हिझम कित्येक समाजसत्तावाद्यांस देखील मान्य नाहीं. इंग्लंड वगैरे देशांत कामकरी वर्गाची चळवळ संघटित व सामर्थ्यवान आहे, पण तिच्यांतले लोक पार्लमेंटरी राज्यपद्धति मोडून रशियन बॉल्शेव्हिक पद्धति स्वीकारण्यास मुळींच तयार नाहींत. ह्या कारणानें अनेक देशांत, भांडवलशाही म्हणजे खाजगी आर्थिक मालकीचें प्राबल्य, सामान्य लोकांस मान्य नसलें व त्यास आळा घालण्याची जरूरी त्यांस भासत असली तरी आपली लोकसत्तात्मक राज्यव्यवस्था, राष्ट्रीय परंपरा, धर्म व संस्कृति हीं झुगारून देण्याची कल्पना त्यांस सर्वस्वी त्याज्य वाटत आहे. क्रांतीपेक्षां उत्क्रांतीवर अनेकांचा अधिक विश्वास असून राष्ट्रीय परंपरा व संस्कृति ह्यांस ते ज्यास्त महत्त्व देतात.

जर्मनी, इटली व रशिया ह्या देशांत सामाजिक क्रांत्या झाल्या असून सामान्य परिचयाच्या लोकशाहीचें तेथें उच्चाटन झालें आहे, आणि राज्यव्यवस्था, व्यापार, उद्योगधंदे, सामाजिक व धार्मिक संस्था ह्यांचे बाबतींत नवीन तऱ्हेची घडी बसवण्यांत आली आहे. ह्या क्रांतींचीं वर्णनें अनेक ग्रंथांत व लेखांत प्रसिद्ध झालीं आहेत. परंतु त्यांवरूनच नव्हे तर सदरहु देशांत जाऊन परिस्थिति पाहून आलेल्यांच्या हकीकतींवरूनहि वस्तुस्थितीची यथातथ्य कल्पना येत नाहीं. ह्याकारणानें, सदरहु देशांतल्या घडामोडींचीं उलट सुलट भडक रंगवलेलीं चित्रें दृष्टीस पडतात, तीं विश्वसनीय मानतां येत नाहींत. रशियांत बॉल्शेव्हिकांनीं केलेल्या समाजघटनेचें स्वतः निरीक्षण करून तिचें सांगोपांग वर्णन मिस्टर व मिसेस सिडने वेब ह्या प्रसिद्ध ब्रिटिश दांपत्यानें एका मोठ्या दोन-पुस्तकी ग्रंथांत केलें आहे, त्यांत दिलेली माहिती बोधप्रद मानली जाणें स्वाभाविक आहे. वेब पतिपत्नींचा राजकीय व आर्थिक घटनेचा व्यासंग दांडगा असून त्यांचे ग्रंथ प्रतिष्ठा पावलेले आहेत. लेखक-लेखिका आपल्या वयाचें आठवें दशक ओलांडून जाण्याच्या स्थितींत आहेत आणि वाढलेल्या वयाचा बुद्धीवर परिणाम झाला असल्याचा संभव त्यांस साशंक करीत आहे. मि. आणि मिसेस वेब ह्यांचा ओढा सामाजिक सुधारणा व समाजसत्तावाद ह्यांच्या बाजूस अगोदरचाच आहे; त्यामुळें बॉल्शेव्हिकांच्या क्रांतीसंबंधाचें त्यांचें स्वतःचें मत कमीअधिक अनुकूल असणें स्वाभाविक आहे. "सोव्हिअट कम्युनिझम : नूतन संस्कृतीचा मनु ?" ह्या त्यांच्या जाड्या ग्रंथाचें परीक्षण "दि पोलिटिकल क्वार्टर्ली "च्या ताज्या अंकांत सर वुइल्यम बीव्हरिज ह्यांनीं, ग्रंथकर्त्यांसंबंधानें आदर मनांत बाळगून व निःपक्षपाती अभ्यासूची वृत्ति ठेवून केलें असल्यानें त्यास विशेष रीतीचें महत्त्व आहे. सर वुइल्यम ह्यांच्या लेखाच्या आधारानें वेब दांपत्याच्या ग्रंथांतल्या मुख्य विषयांचा परिचय वाचकांस करून दिला असतां तो बोधप्रद होईल असें आम्हांस वाटतें. तसें करण्यापूर्वी प्रस्तुत विषयाबाबत चार प्रास्ताविक शब्द लिहिणें उपयुक्त होईल.

---

### सर जॉन एलरमन यांची प्रचंड मालमत्ता

आगबोटींच्या वहातुकीच्या धंद्यांत अत्यंत यशस्वी म्हणून जगद्विख्यात् झालेले म० सर जॉन एलरमन ह्यांनीं आपल्या मागें सुमारें ४८ कोटि रुपयांची मालमत्ता ठेवली आहे. ग्रेटब्रिटनच्या बाहेरच्या इस्टेटींचा ह्या रकमेंत अंतर्भाव नाहीं, तो केल्यास एकूण मालमत्ता ५२ कोटींवर जाईल. तिच्यामधून वारसावरील कराच्या रूपानें ब्रिटिश तिजोरीस सुमारें २४ कोटि रुपये मिळतील. सर जॉन साहेबांनीं आपल्या हयातींत २६ कोटींपेक्षां जास्त रकम प्राप्तीवरील कर म्हणून दिलेली आहे. म्हणजे, त्यांच्या एकट्याच्या इस्टेटीमधून ब्रिटिश सरकारास एकूण सुमारें ५० कोटींचा लाभ झाला आहे व होणार आहे. सर जॉन एलरमन ह्यांच्या पत्नीस २० लक्ष रुपये रोख व दरसाल चार लक्ष रुपये तनखा मिळावयाचा आहे. त्यांनीं आपल्या विवाहित मुलीसाठीं अशाच प्रकारची व्यवस्था करून ठेवली आहे. त्यांच्या थोरल्या मुलास अर्थातच त्यांचा किताब, भरपूर रोख रकम व अडीच कोटींचा ट्रस्ट मिळेल.

---

### पदवीधर शेतकरी बनणार

विश्वविद्यालयाच्या पदवीधरांमध्यें शेतीची आवड निर्माण करून त्यांस शेतीच्या धंद्यांत शिरण्यास प्रोत्साहन देण्याच्या पंजाब सरकारच्या धोरणास अनुसरून, साठ पदवीधरांस सरकारांतून जमिनी बहाल करण्याचा समारंभ ता. १६ रोजीं थाटानें पार पडला. हा प्रयोग यशस्वी झाल्यास, बेकारीवर तोडगा म्हणून त्याचें क्षेत्र वाढविण्यांत येईल, असें सरकारी मंत्री, नवाब मुझफरखान, यांनीं जाहीर केलें.

---

# सहकारी चळवळ

### भिमथडी व इंदापूर तालुका को. सुपरवायझिंग यूनियन, लि., बारामती

वर्षअखेर सभासद सोसायट्यांची संख्या २३ + २८ = ५१ इतकी आहे. अहवालाचे सालीं सोसायट्यांच्या वर्गवारींत विशेषसा फरक झालेला दिसत नाहीं, तथापि सोसायट्यांचा व्यवहार प्रगतीच्या मार्गावर आहे, अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. यूनियन क्षेत्रांतील सोसायट्या तीन सुपरवायझर्समध्यें विभागून देण्यांत आलेल्या आहेत. यूनियनला 'ब' हा ऑडिट वर्ग मिळाला आहे. सभासद सोसायट्यांच्या भागांच्या भांडवलांत वाढ झाली असून सभासदांच्या ठेवी कमी झालेल्या आढळतात. सवलतीच्या योजनेचा सोसायट्यांनीं कसकसा फायदा घेतला, ह्यासंबंधीं अहवालांत तपशील देण्यांत आला असून इतरहि बाबतींत उपयुक्त माहिती विस्तारानें दिलेली आहे. त्यावरून यूनियन गटांतील सोसायट्यांच्या सुधारणेबाबत केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची चांगली कल्पना येते. मंदीमुळें कॅनॉल भागांतल्या सोसायट्यांची स्थिति विशेषच बिघडली असल्यानें यूनिअनच्या सुधारणेबाबतच्या प्रयत्नांचें महत्त्व अधिक आहे, असें म्हटलें पाहिजे. सहकारी खातें, बँक, यूनिअनचे चालक व अधिकारी आणि कार्यकर्ते ह्यांच्या सहकार्याचा सुपरिणाम दिवसानुदिवस वाढत्या प्रमाणांत दिसून येईल अशी आशा आहे. यूनियनची वार्षिक सभा ता. १०-१०-३६ रोजीं भरली होती, त्यावेळीं श्री. कृष्णराव खासेराव काकडे ह्यांची अध्यक्ष व रावसाहेब सोपानराव तुकाराम जाचक ह्यांची उपाध्यक्ष म्हणून निवडणूक करण्यांत आली.

---

### करमाळा तालुका को. सुपरवायझिंग यूनियन

ह्या यूनियनचे कार्यक्षेत्रांत एकूण २८ सोसायट्या आहेत. मागील सालापेक्षां चालू सालीं 'ड' वर्गांतील दोन सोसायट्या 'क' वर्गांत व 'क' वर्गांतील आठ सोसायट्या 'ब' वर्गांत आल्या, ह्यावरून प्रगति होत असल्याचें दिसून येईल. यूनियन 'ब' वर्गांत आहे. करमाळे तालुक्यांत ग्रुप सेक्रेटरींची योजना नाहीं, ती लवकर अंमलांत येणें इष्ट आहे. सोसायट्यांचे एकूण सभासद १,३५६ असून त्यांपैकीं १,०६१ सभासदांकडे १ लक्ष ५७ हजार रु. बाकी येणें आहे. यापैकीं थकलेली बाकी ६७ हजार रु. (४२३⁄४%) आहे. २४० सभासदांच्या जमिनी असून ११६ सभासदांस अजिबात जमिनी नाहींत. २५ सोसायट्या नफ्यांत असून फक्त तीन सोसायट्या अल्पशा तोट्यांत आहेत. सोसायट्यांमार्फत ग्रामसुधारणेचें काम चालू आहे व डेव्हलपमेंट असोसिएशनला सहकार्यानें व आपलेपणानें शेतीसुधारणेबाबत सोसायट्या मदत करीत असतात. यूनियनचा अहवाल उत्साहवर्धक असून, तिचें काम ज्यास्त परिणामकारक व हितावह व्हावें, ह्याबद्दल चालकांचे प्रयत्न चालू आहेत.

---

### खेड व जुन्नर तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि., खेड

नवीन सालाकरितां वरील यूनियनच्या अध्यक्षांचे जागीं श्री. शिवराम रामजी पाटील गुंजाळ यांची व उपाध्यक्षांचे जागीं श्री. गंगाधर विठ्ठल कुलकर्णी ह्यांची बिनविरोध निवडणूक झाली.

---

### खेड व जुन्नर तालुका सहकारी परिषद

वरील परिषद् प्रो. एस. आर. भागवत ह्यांचे अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडली. बँकेनें सोसायट्यांच्या व सोसायट्यांनीं सभासदांच्या कर्जावरील व्याजाचा दर कमी करणें, सवलतीची मुदत वाढविणें, सुखसंपत्तिसंवर्धक सोसायट्या स्थापणें, तलाव बांधणें, ओढे व डोंगरांतील पाणी अडवून धरणें बांधणें, रस्ते दुरुस्त करणें, पिकांची आणेवारी ठरवून सान्यास सूट, तहकुबी व मुदत मागणें, साक्षरतेचा प्रसार करणें, बैलगाड्यांचें धंद्यास उत्तेजन देणें, पन्नास रुपये अगर त्यापेक्षां ज्यास्त सारा भरणाऱ्या व प्राप्तीवरील कर देणाऱ्या इसमांस खेड अर्बन बँकेनें सभासद करून घेण्याबद्दल मंजुरी देणें, ५९ (अ) कलमाबद्दल कानू लवकर मंजूर करणें, स्पेशल रिकव्हरी ऑफिसरची नेमणूक करणें, बँकिंग ऑफिसरच्या नेमणुकीची मुदत वाढविणें, सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या कामांत स्थाइकत्व आणणें, इत्यादि विषयांबाबत परिषदेंत एकूण १४ ठराव पास झाले.

अध्यक्ष, प्रो. भागवत, ह्यांनीं गोष्टीरूपानें सोप्या भाषेंत मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीस आवश्यक असणाऱ्या गोष्टींचें विवेचन केलें व साक्षरता प्रसाराच्या प्रयोगाची माहिती सांगितली.

---

### कळवण तालुका (जि. नाशिक) सहकारी वृत्त

(१) कळवण–चांदवड तालुका को. सु. यूनियनची वार्षिक साधारण सभा ता. ११-१०-३६ रोजीं रा. ब. आर. व्ही. वंडेकर, जे. पी., एम. एऱ. सी., ह्यांचे अध्यक्षतेखालीं झाली. (२) सहकारी नोकरवर्गाची सर ठल्लभाई सामळदास ह्यांचे निधनाबद्दल दुःख प्रदर्शन करण्यासाठीं ता. १६-१०-३६ रोजीं सभा भरली होती. (३) डिबेटिंग क्लबाची ता. ७-१०-३६ रोजीं सभा होऊन ऐतिहासिक स्त्री-चरित्रांवर भाषणें झालीं. (४) सहकारी स्टाफ वाचनालयाची ता. ७-१०-३६ रोजीं सभा होऊन मॅनेजिंग कमिटीची निवडणूक झाली.

---

### पुरंदर ता. को. सु. यूनियन लि., जेजुरी

यूनियनला सामील असलेल्या २८ सोसायट्यांपैकीं १ 'अ' वर्गांत, १३ 'ब' वर्गांत, १२ 'क' वर्गांत व २ 'ड' वर्गांत आहेत. अहवालाचे सालांत १४ सोसायट्यांना सवलतीच्या व्याजाच्या योजनेचा फायदा मिळाला. तालुक्यांत नवीन सोसायट्या काढण्यास वाव असला तरी त्यासंबंधांत उत्साह दिसत नाहीं अशी अहवालांत नोंद आहे. अहवालाचे सालीं यूनियनचे ऑडिट झालें नाहीं. पूर्वीचा तपासणी वर्ग 'अ' आहे. १९३६–३७ सालाकरितां श्री. दगडोबा सोपानराव टिळेकर व श्री. भिकाजी बळवंत इंगळे हे अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडून आले आहेत.

### पश्चिम जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक, लि., धुळें

(३० सप्टेंबर १९३६ अखेरची प्रगति)

भाग भांडवल : १५,६७५ रु., कर्ज मागणी : ३,४७,६२० रुपयांचे १७७ अर्ज; लँड व्हॅल्युएशन ऑफिसरनें तपासलेले अर्ज: ३,४०,५१५ रुपयांचे १७३ अर्ज; बोर्डानें विचारांत घेतलेले अर्ज : १२३; प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेची मंजुरी : १,१६,४५० रुपयांचे ७२ अर्ज; प्रांतिक बँकेजवळ शिलक अर्ज : ३०,७५० रुपयांचे १४ अर्ज; बँकेची कर्ज वाटणी ४५,००० रु.

पहिल्याच साल अखेर नफा दाखविलेली मुंबई इलाख्यांतील ही एकच बँक आहे व झालेल्या कामाच्या आकाराचे बाबतींतहि तिचा नंबर पहिला येईल. ह्याबद्दल बँकेचे चालक व लँ. व्हॅ. ऑफिसर श्री. सप्रे हे अभिनंदनास पात्र आहेत.

## आजचा ॲबिसीनिया

ॲबिसिनिया काबीज केल्यानंतर आतां इटली तेथें आपलें साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत आहे. तद्देशियांच्या हक्कांचें समर्थन करून त्यासंबंधांतील श्वेतवर्णीयांवरील विशिष्ट जबाबदारी प्रतिपादन करणारें साम्राज्यशाहींचें उदार धोरण इटलीनें अंगीकारलेलें नाहीं. उलट, ॲबिसिनिया हा इटलीकरितां आहे व परदेशस्थांचें तेथें कांहीं एक काम नाहीं, असें इटलीचें म्हणणें व्यवहारांत प्रतीत होऊं लागलें आहे आणि त्यांना ॲबिसिनियांतून निघून जाणें भाग पडेल, अशी व्यवस्था करण्यांत येत आहे.

ॲबिसिनियांतील व्यापार सर्वस्वी परकीयांचे हातांत आहे. बँक ऑफ एथिओपिआमध्यें व एशियाटिक पेट्रोलियम कंपनीमध्यें ब्रिटिशांचे हितसंबंध आहेत. हिंदुस्थानांतील कित्येक व्यापारी कुटुंबें तेथें स्थायी झालेलीं आहेत व रेल्वेची मालकी फ्रेंचांकडे आहे. बाकीचा व्यापार ग्रीक व आर्मीनिअन लोकांचे हातांत आहे. रोजच्या व्यापाराची घडी मोडून टाकली, म्हणजे सहाजिकच परकीयांस ॲबिसिनियांतून पाय काढावा लागेल आणि नंतर इटली व ॲबिसिनिया ह्यांमध्यें नव्यानें व्यापार सुरू करतां येईल, असें इटलीचें अंतस्थ धोरण आहे.

ॲबिसिनियामध्यें तेथील डॉलर व इटालियन लिरा हीं दोन चलनें प्रचलित ठेवून तेथील व्यापार मारण्याचा इटलीचा विचार दिसतो. १ डॉलर = १०½ लिरा असा परस्पर-विनिमयाचा खरा दर असतांना, १ डॉलर = ५ लिरा असा इटलीनें दर ठरवून टाकला आहे व ह्या दरानेंच व्यापार चालला पाहिजे, ह्या आग्रहामुळें डॉलर व्यवहारांतून नाहींसा झाला आहे व अंतर्गत आणि परराष्ट्रीय व्यापार बंद पडूं लागला आहे.

फ्रेंच रेल्वेनें आपलीं भाडीं डॉलरमध्यें घेण्याचा आग्रह धरला व त्याकामीं लिरा वापरला जावा असा इटालियन सरकारचा हट्ट होता. अखेर, रेल्वेनें लिरा चलनास संमति दिली व इटलीच्या कारखान्यांतून मालाची खरेदी करण्याचेंहि कबूल केलें. अशा रीतीनें इटलीचें ॲबिसिनियामध्यें आक्रमण चालू असून परदेशीयांची हकालपट्टी होत आहे.

---

## रेल्वे-चौकशी कमिटीची नेमणूक

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या रेल्वेजसंबंधीं चौकशी करून त्यांचें उत्पन्न कसें वाढेल, मोटारी व आगगाड्या ह्यांमधील स्पर्धा कमी होऊन रेल्वेजची परिस्थिति कशी सुधारेल व रेल्वेजच्या अंदाजपत्रकाची शक्य तितक्या कमी मुदतींत तोंडामिळवणी कशी करतां येईल, ह्यासंबंधीं सूचना करण्याकरितां मध्यवर्ती सरकारनें एक चौकशी कमिटी नेमली आहे. लंडन ॲन्ड नॉर्थ ईस्टर्न रेल्वेचे जनरल मॅनेजर सर राल्फ एल. वेजवुड व लंडन, मिडलंड ॲन्ड स्कॉटिश रेल्वेचे चीफ मेकॅनिकल इंजिनियर मि. स्टेनर हे कमिटीचे सभासद आहेत. वरील कमिटी ता. १९ नोव्हेंबर रोजीं मुंबईमध्यें दाखल होईल.

---

## डोमिनिअन्स व ग्रेटब्रिटन ह्यांचा समान दर्जा

बादशहा सातवे एडवर्ड व पांचवे जॉर्ज ह्यांच्या राज्यारोहणाचे प्रसंगीं ग्रेटब्रिटनच्या मुख्य प्रधानांनीं साम्राज्यांतील इतर मुख्य प्रधानांचे तर्फे बादशहांस मुजरे केले होते. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिका ह्यांचा ग्रेटब्रिटनचे बरोबरीचा दर्जा आहे, हें दर्शविण्यासाठी आठव्या एडवर्ड बादशहांचे राज्यारोहणाचे वेळीं ह्या देशांचे प्रतिनिधी स्वतंत्रपणें मुजरा करणार आहेत. हिंदुस्थानास अर्थातच हा मान मिळणार नाहीं.


दि डॉन ऑफ इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., पुणें.

पुणें व सोलापूर येथें

बिल्डिंग इन्व्हेस्टमेंट आणि बँकिंग डिपार्टमेंटची

कंपनीचे बँकर्सनीं पसंत केलेली

ता. १ आक्टोबरपासून सुरू ] नवीन योजना [ ता. १ आक्टोबरपासून सुरू

मुदतीच्या ठेवीवर मासिक व्याज देण्याची

फायदेशीर अपूर्व सोय.

बँकेच्या उतरत्या व्याजाच्या काळांत लोकांस आपले कौटुंबिक निर्वाहास साधन अगर मदत म्हणून ठेवीवर मासिक, नियमित व किफायतशीर व्याज देण्याची व्यवस्था तारीख १ आक्टोबर १९३६ पासून अमलांत आणली आहे.

गरजूंनीं जास्त माहिती मागवावी अगर समक्ष भेटावें.

पुणें, ता. २२-९-३६ | जनरल मॅनेजर.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

This year 1934-35

Exceeds

2 CRORES & 50 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 On Whole Life Rs. 20

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR, MANAGER : Bombay Branch. | N. SARKAR, *General Manager.*

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## खेडुतांच्या रहाणींत सुधारणा

—:०:—

### सरकारचें ग्रामसुधारणेबाबतचें कार्य

हिंदुस्थानांतील कोट्यवधि खेडुतांची रहाणी सुधारावी ह्या हेतूनें मध्यवर्ती सरकारानें ग्रामसुधारणेचा प्रश्न हातीं घेतल्यास दीड वर्ष लोटलें. प्रांतिक सरकारांस ह्याबाबत देणगीदाखल रकमा देण्यांत आल्या, त्यांचा विनियोग कसा केला गेला व ग्रामसुधारणेचें पाऊल कसें पुढें पडलें, ह्यासंबंधीचें, प्रांतिक सरकारांच्या अहवालावरून तयार केलेलें पत्रक हिंदुस्थान सरकारानें असेंब्लीस सादर केलें आहे.

ग्रामसुधारणेच्या योजनेमध्यें अंतर्भूत असलेल्या कार्यक्रमांत खालील बाबींचा समावेश होतो:—

(१) घोडे, बकऱ्या, गाई, कोंबड्या, ह्यांचीं प्रदर्शनें.

(२) सुखसंपत्तिसंवर्धक सोसायट्या.

(३) शाळांतून देण्यासाठी बक्षिसें.

(४) खेडेगांवासाठी सार्वजनिक उपयोगाच्या औषधाच्या पेट्या.

(५) शिशु-प्रदर्शनें.

(६) आरोग्य, शेती, इत्यादि विषयांवर मॅजिक-लॅंटर्नच्या सहायानें व्याख्यानें.

(७) सार्वजनिक रेडियो.

(८) हिंवतापप्रतिबंधक इलाज.

हिंदुस्थान सरकारच्या पत्रकामध्यें प्रांतवार माहिती देण्यांत आली आहे. त्यापैकी मुंबई इलाख्यासंबंधीच्या अहवालाचा गोषवारा येथें दिला आहे.

“औषधांच्या पेट्या, नारूवर इलाज, शिशु-प्रदर्शनें, दायांच्या कामांत सुधारणा, फर्स्ट एडच्या माहितीचा फैलाव, इत्यादि गोष्टींचा आरोग्य व स्वच्छता ह्यासंबंधाच्या योजनेंत समावेश होतो.”

“नारुचा फैलाव होऊं नये, ह्याकरितां विहिरींच्या पायऱ्या काढून टाकून त्याऐवजी पाणी शेंदून किंवा उचलन काढण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे.”

“खेडेगांवांत काम करणारांसाठी शिक्षणवर्गाची योजना, मॅजिक लॅंटर्न व त्याच्या कांचा, ग्रामोफोन, वेगवेगळ्या विषयासंबंधीं माहिती पत्रकें व बोर्ड, इत्यादि मार्गांनीं प्रचारकार्य चालू आहे, आरोग्यासंबंधीं माहितीचा प्रसार करण्यासाठी कांहीं ‘प्रचार गाड्या’ (मोटारी) खरेदी करण्यांत आल्या आहेत.”

“जनावरांची पैदास चांगली व्हावी ह्या प्रीत्यर्थ कांहीं क्षेत्रांत विशेष प्रयत्न करण्यांत येत आहेत. कलमें करणें, बंधारे व ताली घालणें, डुकरांचा नाश करणें, अंडीं विक्री सोसायट्या काढणें, इत्यादि प्रीत्यर्थहि मध्यवर्ती सरकारच्या देणगीचा विनियोग करण्यांत येत आहे.”


अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सरकारमान्य

झारापकर टेलरिंग कॉलेज

माहितीपत्रक मागवा ] आप्पा बळवंत चौक, पुणें २



धी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि०

कडून

हिंदुस्थानांतील प्रजेच्या हितासाठीं अनेक

नाविन्यपूर्ण उत्कृष्ट योजना.

| | |
|---|---|
| होम सेव्हिंग खातें | सोनें विक्री खातें ५ तोळे व १० तोळे लगडी |

| | | |
|---|---|---|
| चालू खातें | सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातें | विमा खातें |

| | |
|---|---|
| त्रैवार्षिक कॅश सर्टीफिकेट खातें | एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी खातें |

सविस्तर माहितीकरितां पत्रव्यवहार कराः—

स्वदेशप्रेमी लोकांनीं स्वदेशी संस्थेला उत्तेजन देणें हें त्यांचें कर्तव्यआहे. जनतेची सेवा करणें हेंच आमचें ध्येय आहे. वरील स्वदेशी संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याचा अनुभव प्रत्येकानें घ्यावा.

सो. न. पोचखानवाला,
मॅनेजिंग डायरेक्टर.



दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

लक्ष्मीरोड, पुणें

तारेचा पत्ता : MAHABANK : फोन नं. ५७२

अधिकृत भांडवल : : १०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवलः ५,००,०००

खपलेलें भांडवल : २,०४,१५०

रोख भरलेलें भांडवल : ९९,२७५

दर शेअरची किं. : रु. ५०

चालू ठेवी द. द. शेंकडा १॥ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर चेक स्वीकारून द. द. २॥ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी तीन महिन्यांपासून पांच वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जें सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे किंवा व्यक्तिशः पतीवर रकमा दिल्या जातात.

कॅशक्रेडिट अगर ओव्हर ड्राफ्ट ह्यांवरहि कर्जें दिलीं जातात.

चेक, बिलें, ड्राफ्ट, हुंड्या, पेन्शन, बिलें वगैरे वसूल करून दिलीं जातात.

कर्जरोख्यांची खरेदीविक्री त्यांवरील व्याज जमा करणें हीं कामें केलीं जातात.

या बँकेवर खातेदारानें काढलेले चेक, सेंट्रल बँक, मुंबई कमिशनशिवाय वसूल करून देते. खात्यांत भरलेले मुंबई बँकांवरील चेक कमिशनशिवाय वसूल केले जातात.

शेअर खरेदीबद्दल व व्यवहाराच्या नियमांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम्. व्ही. गोखले,
मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर १९३५ पासून ) | ३% |
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... | १२१—७ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... | १०९—२ |
| ४½% लांब मुदत ( १९५५-६० ) ... | १२०—० |
| ४% १९६०–७० ... ... | ११५-१५ |
| ४% १९४३ ... ... ... | ११२—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... | १००—२ |
| ३½% १९४७–५० ... ... | १०७-१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... | १०१—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११२—६ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... | १११—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७०वर्षें मुदत) | ११२—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... | ११३-१० |
| ५% म्हैसूर ( १९५५ ) ... ... | १२५-१२ |

### मंडळ्यांचे भाग

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( भाग १०० चा, पैकीं ५०रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | १३६—४ |
| बँक ऑफ बडोदा (१०० पैकीं ५० रु. भरले व १०% डिव्हिडंड ) | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५० पैकीं २५ रु. भरले व ६% डिव्हि. ) | ३५-१२ |
| इंपीरिअल बँक (५०० रु., १२% डिव्हि. ) | १५९१—४ |
| रिझर्व्ह बँक ( १०० रु. ) | १४०-४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४¾%) | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ४½%) | ९९—० |
| अहमदाबाद-प्रांतज ( ५०० रु. चा भाग, डिव्हि. १० ) | ९१२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ( ऑर्डि. भाग ५० रु. डिव्हि. १२% ) | १५५-१० |
| कराची ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९% ) | २६०—० |
| पुणें इलेक्ट्रिक् ( १०० रु. चा भाग, डिव्हि. ९%) | २५५—० |
| टाटा पॉवर (१,००० रु. ऑर्डि, डिव्हि. ६½% ) | १५७१—४ |
| टाटा पॉवर ( १,०००रु. प्रेफरन्स, डिव्हि.७½%) | १६०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| टाटा आयर्न ( १५० रु. प. प्रेफरन्स डिव्हि. ६% ) | २०१—४ |
| टाटा आयर्न (१०० रु. डु. प्रेफरन्स, २२रु. ८ आ.) | १७३—० |
| टाटा आयर्न ( ७५ रु. ऑर्डि. ) | १९९—० |
| टाटा आयर्न ( ३० रु. डिफर्ड ) | ७९५—० |

## हिंदुस्थानांत जपानी लोखंडी पत्रे उतरले

लोखंडी नळीच्या पत्र्यांची जपानमधून आयात वाढीस लागण्याचा संभव दिसत आहे. एप्रिल ते जून १९३६ ह्या मुदतीमध्यें ५ लक्ष रुपयांचे जपानी पत्रे हिंदुस्थानांत दाखल झाले. लोखंडी मालाचें उत्पादन वाढविण्यासंबंधीं जपाननें पंचवार्षिक कार्यक्रम आखला असून आज नाहीं तरी पांच वर्षांत ह्या धंद्यामध्येंहि जपान हिंदुस्थानाशी स्पर्धा करू लागण्याचा संभव आहे, असें टाटा सन्स लि. च्या मि. दलालांचें मत आहे.

## पोस्टांतील दहा लक्ष ' निर्जीव ' खातीं

गेल्या दहा वर्षांत ज्या सेव्हिंग्ज खात्यांत पैशाचा भरणाहि झाला नाहीं व त्यांतील रकमा काढूनहि घेतल्या गेल्या नाहींत, अशीं पोस्टामध्यें ११,१०,७६२ सेव्हिंग्ज बँक खातीं आहेत. ह्या सर्व खात्यांवर एकूण सुमारें १५ लक्ष रुपये शिलक आहेत, म्हणजे, प्रत्येक खात्यावर १ रु. ४½ आणे अशी सरासरी पडते. १९३४–३५ अखेर पोस्टांतील एकूण खात्यांची संख्या ३० लक्ष असून त्यांतील ठेवींची रकम ४३ कोटि रुपयांवर आहे. एकंदर व्यवहारांच्या मानानें वरील ११ लक्ष खातेदारांचे १४ लक्ष रुपये म्हणजे कांहींच नाहींत व ते परत करण्यास पडणारा त्रास व खर्च अनाठायी होईल, असे सर फ्रँक नॉइस ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

## वडगांव येथील से. सबजज्ज यांचे कोर्टांत

### मुक्काम वडगांव येथें

दिवाणी मुकद्दमा नंबर २६५ सन १९३४ पैकीं

पृथ्वीराज चौथमल मारवाडी लोणावळे } वादी

विरुद्ध

१ चांदबी ऊर्फ जैतुनबी कोम सयद महमद मुसलमान
२ कुलसूंबी भ्र. रमजूभाई ऊर्फ रमजान धोंडूभाई } प्रतिवादी

प्रतिवादी १–२यांसः—

ज्यापेक्षां सदरीं लिहिलेला वादी यानें ह्या कोर्टास अर्जी केली आहे कीं, सदर कामी वादीनें ता. १५।८।३४ रोजी प्रतिवादीं विरुद्ध प्राथमीक हुकूम नामा मिळविला आहे तो पक्का करणेबद्दल कोर्टांत अर्ज केला आहे.

त्यापेक्षां यावरून तुम्हांस बजाविण्यांत येत आहे कीं, तारीख २१ माहे ११ सन १९३६ रोजीं सकाळचे ११ वाजतां तुम्हीं सदरहू अर्जीविरुद्ध कारण दाखविण्यासाठीं ह्या कोर्टांत जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडराच्यामार्फत, हजर व्हावें, व तसें तुम्हांकडून घडून न आल्यास, सदरहू अर्जीची एकतर्फी चौकशी होऊन निकाल केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वीं बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख २१ माहे १० सन १९३६ रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिली.

D. V. KSHIRSAGAR

शिक्का

क्लार्क ऑफ दी कोर्ट वडगांव.

## जे. जी. दातीर

जिलब्या मारुतीजवळ, घ. नं. ८७२, पुणें २

सर्व तऱ्हेच्या समारंभाकरितां हार, गोटे, इत्यादि माल सुबक स्वस्त व वक्शीर तयार करून मिळेल.

## मुलांचा आनंद कोणा पालकाला नको? त्यांतून 'आनंदा' चा खास अंक! मग काय त्यावर मुलांच्या उड्यावर उड्या!

## 'आनंदा'च्या खास अंकाचा थाट

आतां सर्व मुलांना माहीत झाला आहे. ती दोन रंगी छपाई, चित्रांची लयलूट, गोष्टींची रम्यता, कवितांची बहार—हो! सांगायचें विसरलोंच! यंदां पुष्कळ कवितांना त्यांतील वर्णनाच्या चित्रांचीच चौकट बसविली आहे—गुळगुळीत कागद, सुबक छपाई व मोहरेदार मुखपृष्ठ हे खास अंकाचे विशेष त्यांना ठाऊक झाले आहेत. 'आनंद' वर्षभर त्यांची किती करमणूक करतो, त्यांच्या ज्ञानांत किती भर घालतो व त्यांना किती हवाहवासा वाटतो हें तीं केव्हांहि सांगतील. आपण आपल्या मुलांकरितां तो एक वर्षभर घेऊन पहा म्हणजे आपणांसहि कळून येईल. **वार्षिक वर्गणी ट. ह. सह लहान अंकाची २ रु. मोठ्या अंकाची ३ रु. वर्षारंभ जुलैपासून.** अंक दरमहा पंधराव्या तारखेस प्रसिद्ध होतो.

पत्ताः—म्यानेजर आनंद, पुणें २.

## संजीवन हेअर टॉनिक

**दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय**

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

## "दुसरें मूल्यमापन जाहीर झालें"

स्थापनेपासूनच भागीदारांना ६ टक्के फायदा व विमेदारांस वाढता नफा वांटून जुन्या व स्थिर झालेल्या कंपन्यांस कठीण असें अपूर्व यश संपादन केलेली पहिलीच महाराष्ट्रीय विमा कंपनीः—

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें.

अध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, संचालक, केसरी

| हयातींतील विम्यास | दुसऱ्या मूल्यमापनांत वांटलेला दर हजारीं त्रैवार्षिक नफा | हयातीनंतर विम्यास |
|---|---|---|
| ३७॥ रु. | | ४५ रु. |

जास्त माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स.

## न. वि. वडनेरकर

जव्हेरी आणि सराफ, रविवार पेठ, सराफ बझार, पुणें २.

आमच्याकडे सोनें, चांदी व मोत्यांचा माल खात्रीचा मिळेल. तसेंच जुन्या जिनसा योग्य भावानें खरेदी केल्या जातील.

शुभकार्यांत भेट देण्याकरितां सोन्याचांदीच्या नमुनेदार व सुबक वस्तु मिळतील.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।३ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.